गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ७४ वा | रविवार ३० जुलै २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| 77Volume 1| Issue 74 | Date : 30/07/2023 | blow :Sunday | Page 4 | Price 4

## संपूर्ण विदर्भासह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा 'यलो अलर्ट'

मुंबई : राज्याच्या बहुतांश भागात पावसाने हजेरी लावली आहे. चांगला पाऊस झाल्यामुळं धरणांच्या पाणीसाठ्यात देखील वाढ होताना दिसत आहे. अनेक भागात नदी नाले दुथडी भरुन वाहत असून, पूरस्थिती निर्माण झाली आहे. तर कुठं शेती पिकांना देखील या पावसाचा फटका बसलाय. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार आजही राज्यात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. संपूर्ण विदर्भासह कोकणातील काही जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये आज पावसाचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

# देशात १०+२ ऐवजी नवीन शिक्षण पद्धत, पंतप्रधान मोदी यांची मोठी घोषणा

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, २९ जुलै रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त अखिल भारतीय शैक्षणिक परिषदेचं उद्घाटन केलं. नवी दिल्लीतील प्रगती मैदानाच्या भारत मंडप येथे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी शिक्षेचं महत्त्व पटवून देताना भविष्यातील शैक्षणिक बदलांबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. दहावी आणि बारावी ऐवजी नवीन शिक्षण प्रणाली राबवण्यात येणार असून उइडए अभ्यासक्रमात बदल होणार असल्याची मोठी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली आहे. भारताला संशोधन आणि नवीन कल्पनांचे केंद्र बनवण्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पारंपारिक ज्ञान प्रणालीपासून भविष्यातील तंत्रज्ञानाला संतुलित पद्धतीने महत्त्व देण्यात आले आहे, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं. यावेळी ते पुढे म्हणाले की, 'देशातील शिक्षणतज्ज्ञांनी संशोधन परिसंस्था मजबूत करण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आमच्या विद्यार्थ्यांना नवीन व्यवस्थेची चांगली माहिती आहे. १०+२ शिक्षण पद्धतीच्या जागी ५+३+३+४ शिक्षण पद्धत सुरू केली जात आहे. शिक्षणाची सुरुवात वयाच्या तिसऱ्या वर्षापासून होईल. यामुळे देशात एकरुपता येईल.'

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, येत्या काळात देशातील सर्व सीबीएसई शाळांमध्ये एकच अभ्यासक्रम लागू केला जाईल. यासाठी २२ भाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार केली जात आहेत. दरम्यान यावेळी पीएमएसश्री योजनेचा पहिला



हप्ताही जारी करण्यात आला.

पंतप्रधान म्हणाले की, ''शिक्षणातच देशाचे नशीब बदलण्याची ताकद आहे. देश ज्या ध्येयाने पुढे जात आहे, त्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. तुम्ही (विद्यार्थी) त्याचे प्रतिनिधी आहात. । पान २ वर

## सावधान! राज्यात डोळ्याची साथ सर्वाधिक रुग्णसंख्या पुण्यात



पुणे : राज्यात अनेक भागांत डोळे येण्याची साथ सुरू झाली आहे. डिनो विषाणूमुळे डोळे येत असून, राज्यात सर्वाधिक रुग्णसंख्या पुणे शहर आणि जिल्ह्यात नोंदविण्यात आली आहे. राज्यात यंदा २७ जुलैपर्यंत असे ३९ हजार ४२६ रुग्ण सापडले असून, त्यातील ७ हजार ८७१ रुग्ण पुण्यातील आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली. राज्यात पुण्यानंतर बुलढाण्यात मोठ्या संख्येने डोळ्याच्या साथीचे रुग्ण सापडले आहेत. बुलढाण्यात ६ हजार ६९३ रुग्ण आढळले असून, अमरावती २ हजार ६११, गोंदिया २ हजार ५९१, धुळे २ हजार २९५, जालना १ हजार ५१२, वाशिम १ हजार ४२७, हिंगोली १ हजार ४२५, नागपूर महापालिका १ हजार ३२३, अकोला १ हजार ३०६, यवतमाळ । पान २ वर

## २०२४ ची आपली संधी हुकली तर हा संपूर्ण देश नालायक लोकांच्या हातात जाईल..

### उद्धव ठाकरेंचा नरेंद्र मोदींवर हल्लाबोल

ठाणे : ठाकरे गटाकडून आज ठाण्यात हिंदी भाषक कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचं आयोजन केलं होतं. या मेळाव्यातून ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी



पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भारतीय जनता पार्टीवर जोरदार हल्लाबोल केला. २०२४ ची आपली संधी हुकली तर हा संपूर्ण देश नालायक आणि हुकूमशहांच्या हातात जाईल, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

हिंदी भाषक कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे म्हणाले, मला विचारलं जातं की, तुम्ही सगळ्यांना सोबत का घेत आहात? तुम्ही मोदींच्या विरोधात आहात का? तर मी सांगू इच्छितो की, मी मोदी किंवा कोणत्या व्यक्तीविरोधात नाहीये. मी हुकूमशाहीच्या विरोधात नक्की आहे. भारतमातेच्या हातापायांत पुन्हा बेड्या पडताना मी बघू शकत नाही. मी माझ्या भारतमातेला कुणाचंही गुलाम बनू देणार नाही. हीच शपथ आज आपल्याला घ्यायची आहे.

आधी आपल्या भारतात बाहेरच्या देशातून मुघल यायचे. । पान २ वर

## न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ




मुंबई : अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी आज मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली. राजभवन येथे शनिवारी (दि. २९ जुलै) झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल रमेश बैस यांनी न्या. उपाध्याय यांना पदाची शपथ दिली. शपथविधी सोहळ्याला राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, न्या. उपाध्याय यांचे कुटुंबिय, लोकायुक्त विद्यासागर कानडे, राज्य मानवाधिकार आयुक्त न्या. के के तातेड, राज्य निवडणूक आयुक्त युपीएस मदान, मुंबई व अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश तसेच अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश व वकील उपस्थित होते. सुरुवातीला । पान २ वर

## बुलढाण्यात दोन बसेसची समोरासमोर धडक, भीषण अपघातात ६ जणांचा मृत्यू, तर २१ जखमी



बुलढाणा : बुलढाण्यात खासगी ट्रॅव्हल कंपनीच्या दोन बसेसची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे, तर २१ प्रवाशी जखमी झाले आहेत. जखमींपैकी अनेकांची तब्येत चिंताजनक आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास नागपूर-मुंबई महामार्गावर मलकापूरजवळ ही घटना घडली.

या अपघाताची माहिती देताना जिल्हाधिकारी डॉ. एचपी तुम्मोद म्हणाले, मलकापूर येथे मोठा अपघात झाला आहे. दोन ट्रॅव्हल बसेसची धडक झाल्याने हा अपघात झाला. त्यात पाच जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अन्य एका व्यक्तीचा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. उर्वरित जखमींवर उपचार सुरू आहेत. त्यातील एकाची तब्येत चिंताजनक आहे. त्यांना आयसीयूत ठेवण्यात आलं आहे.

राष्ट्रीय महामार्ग ६ वर मलकापूर नजीकच्या लक्ष्मी नगरातील रेल्वे उड्डाणपूलावर शनिवारी (२९ जुलै) पहाटे साडेतीनच्या सुमारास ही भीषण दुर्घटना घडली. । पान २ वर

## मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्रातील विविध विकास कामांसाठी ५७कोटी ६८लाख निधी मंजूर : आ.आवताडे

पंढरपूर/प्रतिनिधी: पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्रातील भारत देशाची दक्षिण काशी म्हणून ख्याती असणाऱ्या पंढरपूर शहराच्या व मंगळवेढा तालुक्यातील विविध रस्त्यांच्या विविध प्रलंबित विकास कामांसाठी चालू पावसाळी अधिवेशनादरम्यान ५७कोटी ६८लाख रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.



आमदार आवताडे यांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांची पूर्तता होण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार, महसूल मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.रवींद्र चव्हाण यांच्याकडे या निधीसाठी पत्रव्यवहार केला होता. आमदार आवताडे यांच्या या मागणीची दखल घेऊन पंढरपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाची सद्य काळात असणारी इमारत फार जुनी झाली असल्याने याठिकाणी उपविभागीय कार्यालयाच्या दोन इमारती। पान २ वर

**पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि धोरणात्मक प्रगतीसाठी आपल्या नेतृत्व साधनेच्या माध्यमातून नेहमीच आग्रही असणारे लोकप्रतिनिधी म्हणून आ समाधान आवताडे यांची मतदारसंघामध्ये विविध विकासकामांच्या माध्यमातून प्रतिमा उंचावत असल्याचे चित्र आहे. मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या रस्ते, वीज पाणी, शिक्षण, आरोग्य आदी सेवाक्षेत्रांच्या कार्यपूर्ततेसाठी आ आवताडे हे नेहमीच भरघोस निधीच्या रूपाने प्रयत्नशील असतात**

**- तानाजी काकडे (माजी मिस्टर सभापती पं.स. मंगळवेढा)**

## लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली!

### भाजपच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा

### विनोद तावडेंसह पंकजा मुंडे यांच्यावर जबाबदारी

नवी दिल्ली : भाजपने लोकसभा निवडणुकीआधी राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा केली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी आज, २९ जुलै रोजी पक्षाच्या केंद्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा केली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी शनिवारी त्यांच्या नव्या टीमची घोषणा केली. यामध्ये रमण सिंह आणि वसुंधरा राजे यांना राष्ट्रीय उपाध्यक्ष करण्यात आलं आहे. तर बंदी संजय कुमार आणि राधामोहन अग्रवाल यांना सरचिटणीस बनवण्यात आलं आहे.

**१३ राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि ८ महासचिव** भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी लोकसभा निवडणूक २०२४ साठी आपली टीम जाहीर केली आहे. नड्डा यांच्या टीममध्ये नव्या आणि जुन्या चेहऱ्यांचा ताळमेळ बसवण्यात आला आहे. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री रमण सिंह आणि राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. नड्डा यांच्या टीममध्ये १३ राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि आठ राष्ट्रीय महासचिव आहेत.

भाजपच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची घोषणा




**भाजपच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची यादी**

राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. रमण सिंह, आमदार (छत्तीसगड), राजे, आमदार (राजस्थान), रघुबर दास (झारखंड), बैजयंत पांडा (ओडिशा), सरोज पांडे, खासदार (छत्तीसगड), रेखा वर्मा, खासदार (उत्तर प्रदेश), डी.के. अरुणा (तेलंगणा), एम. चौबा एओ (नागलंगे), अब्दुल्ला कुट्टी (केरळ), लक्ष्मीकांत बाजपेयी, खासदार (उत्तर प्रदेश), लता उसेंडी (छत्तीसगड), तारिक मन्सूर, विधान परिषद सदस्य (उत्तर प्रदेश), **राष्ट्रीय महासचिव** अरुण सिंह, खासदार (उत्तर प्रदेश), कैलाश विजयवर्गीय (मध्य प्रदेश) दुष्यंत कुमार गौतम (दिल्ली), तरुण चुघ (पंजाब) विनोद तावडे (महाराष्ट्र) सुनील बन्सल (राजस्थान) संजय बंदी, खासदार (तेलंगणा) राधामोहन अग्रवाल, खासदार (उत्तर प्रदेश) **राष्ट्रीय सचिव** विजया राहटकर (महाराष्ट्र) सत्या कुमार (आंध्र प्रदेश) अरविंद मेनन (दिल्ली) पंकजा मुंडे (महाराष्ट्र) नरेंद्र सिंह रैना (पंजाब) डॉ. अल्का गुर्जर (राजस्थान) अनुपम हाजरा (पश्चिम बंगाल) ओमप्रकाश धुर्वे (मध्य प्रदेश) ऋतुराज सिन्हा (बिहार) आशा लाकडा (झारखंड) कामख्या प्रसाद तासा (आसाम) सुरेंद्र सिंह नागर (उत्तर प्रदेश) अनिल अटोनी (केरळ)

## साहेब, खड्डे बुजविणार की नाही? अक्कलकोट शहरवासियांतून संतप्त सवाल

अक्कलकोट/प्रतिनिधी : साहेब, खड्डे बुजविणार की नाही? का अपघाताची वाट बघताय? असा संतप्त सवाल शहरवासियांतून स्वामी भक्तांतून व्यक्त होत आहे.राज्यातल्या टॉप फाईव्हमधील तीर्थक्षेत्र म्हणून श्रीक्षेत्र अक्कलकोट गणले जात असतानाही अद्यापही विकासापासून कोसो दूर आहे. सध्या प्रशासक म्हणून मुख्याधिकारी हे कार्यरत आहेत. ज्यावेळी मुख्याधिकार्यांनी प्रशासक म्हणून कारभार हाताळण्यास सुरुवात केली. त्यावेळी शहरवासियांतून विकासाचे गणित आखले जात होते. मात्र सध्याची परिस्थिती पाहता मुख्याधिकारी हे 'मुख्याधिकारी व त्यांची टीम' जिल्हा पालिका अधिकार्यांना हाताशी धरुन विकासाच्या नावाखाली कोट्यावधीची कामे व कामांची बिले काढण्यात व्यस्त असल्याचे स्पष्ट होत आहे. श्री वटवृक्ष मंदिरालगत हत्ती तलावाच्या सांडपाण्याकरिता नव्याने बांधलेल्या सीडी वर्क हे गर्दीच्या नावाखाली झटपट उरकुन टाकण्यात आले. मात्र भले मोठे पडलेल्या खड्यांकडे अद्यापही नगरपरिषदेचे दुर्लक्ष होत आहे. एक कर्तव्यदक्ष युवक मुख्याधिकारी म्हणून श्रीक्षेत्र अक्कलकोटला रुजू झाल्यावर सचिन पाटील यांच्याकडे पाहिले जात होते. कालांतराने गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या बांधकाम विभागातील कर्मचार्यांच्या संगतीमुळे विकासाचे काम कमी, स्व उत्पन्न जास्त हे पहायला मिळत असून तत्कालीन सत्ताधारी व विरोधक यांच्या काहीजणांचा स्वहितामुळे त्यांना पाठिंबा असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. त्यामुळे मुख्याधिकारी हे सध्या 'हम करेसो कायदा' प्रमाणे प्रशासनात वावरत असल्याचे दिसत आहे.



संपूर्ण कार्यालयीन प्रशासन देखील कोलमडल्याचे शहरवासियांतून बोलले जात आहे. नगरपालिकेचे विविध दाखले, तक्रार निवारण होताना दिसत नाही.

शहरातील स्वच्छतेची परिस्थिती पाहता कचरा डेपो, स्वच्छतागृहे अस्वच्छ, गटारी तुंबलेल्या, अशा पावसाळ्यात देखील पिण्याच्या पाण्याचे नियोजन नाही, दिवाबत्ती, काही भागात खांबावरील लाईट नाहीत, स्मशानभूमी वाढत चाललेले अतिक्रमण व अस्वच्छता, बिन तोट्यांची नळे, अनधिकृत नळे, हर घर जलचा तर पत्ताच नाही, व्यापारी संकुलनाकडून भाडे आकारले जाते मात्र त्यांना सोयी सुविधा दिल्या जात नाहीत. कांदाबाजारसह शहरातील विविध ठिकाणी झालेले अतिक्रमणामुळे शहराचे विद्रुपीकरण, ए-वन चौकातील व जुना अडत बाजार लक्ष्मी मार्केट समोर असलेले व्यापारी संकुलन पडायला झालेले असून मात्र याकडे ठोस उपाय योजना अद्यापही केले जात नाही. नगरपरिषद अपघाताची वाट बघतोय काय? असा संतप्त सवाल शहरवासियांसह पुणे, मुंबई येथील स्वामी भक्तांतून व्यक्त होत असून भक्त मंडळाकडून लवकरच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेवून मांडण्यात येणार असल्याचे स्वामीभक्तांतून सांगण्यात आले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
रविवार दि.३० जुलै २०२३


## * सुविचार *

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### रस्त्यात खड्डे का..?

राज्याच्या विविध भागातील रस्त्यांचे सध्या जे काय 'चित्रमय प्रदर्शन' सोशल मीडियावर दाखवले जाते आहे ते पाहून प्रशासकीय यंत्रणांची संवेदनशीलता हरवली आहे असेच कुणाचेही ठाम मत होईल. गाजावाजा करत स्त्याची कामे सुरू केली जातात आणि पावसाळा सुरू होताच त्याचे खरे रूप समोर येते. रस्ते कामात प्रचंड भ्रष्टाचार होत असतो किंबहुना हात मारल्याशिवाय रस्त्याची कामे होत नसतात. रस्ते कामातील भ्रष्टाचाराला एक अलिखित प्रतिष्ठा मिळाली आहे. प्रचंड खर्च करूनही रस्त्याची दुर्दशा होत असेल तर त्याबाबत कठोर होण्याची गरज आहे. परंतु, हा प्रकार मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्यासारखा आहे. कारण भ्रष्टाचाराची पाळेमुळे थेट वरपासून मुकादमापर्यंत पोहोचलेली आहेत. अनेक रस्त्यांच्या कामात कसा भ्रष्टाचार झाला आणि कोण कोण त्यात सहभागी असते याच्या सुरस कथा प्रसिध्द होत असतात. गेल्या काही वर्षांत दुचाकीपासून मल्टी ॲक्सल वाहनांची संख्या वाढली आहे. रस्त्यासारखी मूलभूत सुविधा धडपणे नसताना दररोज हजारोंच्या संख्येने छोटी-मोठी वाहने रस्त्यावर उतरवली जात आहेत. पावसाळ्यात या वाहनांच्या नशिबी खड्डे येत असतात. रस्त्यावर पडणारे खड्डे खाबुगिरीला सोकावलेल्या यंत्रणांसाठी इष्टापत्ती असतात. करोडो रुपये रस्त्याच्या कामात रिचवले जात आहेत. जनताही चरफडण्यापलीकडे काही करत नसल्याचे यंत्रणांना पक्के ठाऊक झाल्याने तेही निर्धास्त असतात. गणेशोत्सव जवळ आला की खड्ड्यांतून 'वृक्षारोपण' करण्याचे फार्स सुरू होतील. फार्स एवढ्यासाठीच की रस्त्याच्या दुरवस्थेबाबत इतर वेळी कुणीही काहीही बोलत नाही. प्रगतीचा मार्ग तंदुरूस्त रस्त्यावरूनच जातो असे म्हणायचे आणि प्रत्यक्षात हे रस्ते तंदुरूस्त कसे राहणार नाहीत याची व्यवस्थित काळजी घेतली जात आहे. हा प्रकार संतापजनक आहे. चाकरमानी वेळेवर कामावर पोहोचू शकत नाहीत. रुग्णवाहिका वाहतूक कोंडीत अडकून पडत आहेत. याचे सरकारला काहीच कसे वाटत नाही, याचे नवल वाटते. रस्ते बांधकामात अत्याधुनिक तंत्रज्ञान आल्याचे म्हटले जाते. मग ते तंत्रज्ञान खड्डे बुजविण्यासाठी का वापरले जात नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पान १ वरुन

### देशात १०+२ ऐवजी नवीन..

अखिल भारतीय शिक्षा समागमाचा भाग बनणे ही माझ्यासाठी एक महत्त्वाची संधी आहे.''

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मातृभाषेतील शिक्षणावरही पंतप्रधान मोदींनी भर दिला. तरुणांना त्यांच्या प्रतिभेऐवजी त्यांच्या भाषेच्या आधारे न्याय देणे हा त्यांच्यावर सर्वात मोठा अन्याय असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. मातृभाषेतील शिक्षणामुळे आता खरा न्याय भारतातील युवा कलागुणांना मिळणार आहे. सामाजिक न्यायासाठीही हे महत्त्वाचे पाऊल आहे.

### सावधान! राज्यात डोळ्याची साथ

१ हजार २९८, परभणी १ हजार १०९, जळगाव १ हजार ९३ अशी रुग्णसंख्या आहे. सर्वांत कमी रुग्णसंख्या रायगडमध्ये असून, तिथे केवळ एक रुग्ण सापडला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत ३२४ रुग्ण आढळले आहेत.सर्वसाधारणपणे पावसाळ्याच्या सुरुवातीला डोळ्यांची साथ येण्याचे प्रमाण वाढले आहे. याच महिन्यात आळंदी परिसरात डोळ्याच्या साथीचे चार हजारांहून अधिक रुग्ण आढळले होते. यानंतर जिल्हा परिषदेने त्या परिसरातील शाळांमध्ये मुलांच्या तपासणीची मोहीम हाती घेतली होती. आळंदी परिसरातून राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेने (एनआयव्ही) रुग्णांचे नमुने गोळा केले होते. त्यांची तपासणी करून आरोग्य विभागाकडे अहवाल सादर केला जाणार आहे.

रुग्णांना नेमक्या कशामुळे हा त्रास होत आहे, हे तपासण्याची आवश्यकता आरोग्यतज्ज्ञांनी अधोरेखित केली आहे. डोळ्यांना संसर्ग हा जीवाणू, विषाणू की लर्जीमुळे झाला, हे तपासण्याची आवश्यकता आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा डोळ्याच्या साथीचे प्रमाण जात असल्याचेही आरोग्यतज्ज्ञांनी स्पष्ट केले.

### २०२४ ची आपली संधी हुकली

बाबरही बाहेरच्या देशातून आला होता. त्यामुळेच तर आपण बाबरी मशीद पाडली. त्यानंतर इंग्रज आले. ते १५० वर्षे राज्य करून गेले. इंग्रजांशी लढताना आपल्या अनेक पिढ्या मरण पावल्या. पण आपण लढत राहिलो. शेवटी तो दिवस उजडलाच आणि इंग्रजांनाही आपला देश सोडून जावं लागलं. आता आपल्या घरातलेच आपल्या डोक्यावर बसू पाहत आहेत. पण कुणीही असलं तरी गुलामी ही गुलामीच असते. त्यामुळे मी माझ्या भारतमातेला पुन्हा गुलाम बनू देऊ इच्छित नाहीये, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, तुम्ही गुलाम बनून विकासाचं स्वप्न पाहू शकता का? ते उठ म्हटले तर उठावं लागेल, ते बस म्हटले तर बसावं लागेल.

हा विकास तुम्हाला मंजूर आहे का? आज आपला देश अशा वळणावर आला आहे. २०२४ ची संधी हुकली तर रेल्वे सुटली असंच समजावं लागेल. त्यानंतर आपला देश आपल्या हातून निसटून जाईल. मग हा देश या नालायक लोकांच्या हातात जाईल. या हुकूमशहांच्या हातात जाईल. त्यामुळे मला पूर्ण विश्वास आहे, तुम्ही सगळे एकत्र आला आहात आणि एकत्रच राहालं.

अलीकडेच तेजश्री प्रधान आणि शुभांगी गोखले यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांची नवी मालिका स्टार प्रवाहवर सुरु होणार असल्याचं सांगितलं. ही नवी मालिका नेमकी कोणती? मालिकेची गोष्ट काय असेल? कोणते कलाकार असतील? याविषयी प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता होती. ज्या मालिकेविषयी इतकं भरभरुन बोललं जातंय ती मचअवेटेड मालिका ४ सप्टेंबरपासून रात्री ८ वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मालिकेचं नाव आहे

प्रेमाची गोष्ट. स्टार प्रवाहच्या प्रत्येक मालिकेतून नातेसंबंधांवर भाष्य केलं जातं. प्रेमाची गोष्ट ही मालिका देखिल नात्यांची गुंफण असेल. चिमुकल्या सईवरच्या प्रेमापोटी दोन विभिन्न स्वभावाचे मुक्ता आणि सागर कसे एकत्र येतात आणि त्यांच्यातलं प्रेम कसं बहरत जातं हे सांगणारी सुंदर, तरल कथा म्हणजे प्रेमाची गोष्ट.

प्रेमाची गोष्ट या नव्या मालिकेत प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री तेजश्री प्रधान मुक्ता गोखले ही भूमिका साकारणार असून राज हंचनाळे सागर कोळीच्या भूमिकेत दिसेल. यासोबतच शुभांगी

## सांगेल नात्याचं वैशिष्ट्य 'प्रेमाची गोष्ट...'

## ४ सप्टेंबर पासून स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी मालिका 'प्रेमाची गोष्ट'

गोखले, संजीवनी जाधव, अपूर्वा नेमळेकर, संजय शेजवळ, योगेश केळकर, उमेश घाडगे, सुप्रीत कदम आणि बाल कलाकार इरा पारवडे अशी दिग्गज कलाकारांची फौज मालिकेतून भेटीला येईल. राहुल लिंगायत या मालिकेचं दिग्दर्शन करणार आहेत.

या नव्या मालिकेविषयी सांगताना स्टार प्रवाहचे कार्यक्रम प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'प्रेमाची गोष्ट या नावातच सगळं काही येतं. हळुवार, संवेदनशील आणि पुन्हा एकदा आजच्या पीढीची गोष्ट घेऊन स्टार प्रवाह वाहिनी रसिकांना दर्जेदार करमणूक देण्यास सज्ज आहे. दिग्गज कलाकार आणि सक्षम लेखन, दिग्दर्शन असलेली ही प्रेमाची गोष्ट प्रेक्षकांना नक्की आवडेल.'

मुक्ता गोखले या व्यक्तिरेखेविषयी सांगताना तेजश्री प्रधान म्हणाली, 'स्टार प्रवाह वाहिनीसोबत जवळपास १३ वर्षांनी पुन्हा एकदा काम करताना अतिशय आनंद होतोय. घराघरातील गृहिणी समरसून मालिका पहात असतात. त्यामुळे एक कलाकार म्हणून कोणतंही पात्र साकारताना सामाजिक जबाबदारीचं भान राखण्याचा मी प्रयत्न करते.

मुक्ता हे पात्र प्रेक्षकांना नक्कीच आवडेल. मुक्ता साकारतान माझ्यासमोर मुलगी, सून आणि आईच्या भूमिकेतला समंजसपणा जपण्याचं आव्हान असेल.'मुक्ताच्या आईची म्हणजेच माधवी गोखले ही भूमिका साकारणार आहेत

सुप्रसिद्ध अभिनेत्री शुभांगी गोखले, 'या भूमिकेविषयी सांगताना शुभांगी ताई म्हणाल्या स्टार प्रवाहसोबत खूप जुनं नातं आहे. अग्निहोत्र, अग्निहोत्र २ आणि आता प्रेमाची गोष्ट. मालिकेची टीम खूप उत्तम आहे

. या मालिकेचं लेखन हे बलस्थान म्हणता येईल. माधवी या पात्राच्या निमित्ताने साधेपणातलं सौंदर्य जपायला मिळेल.' तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका प्रेमाची गोष्ट ४ सप्टेंबरपासून रात्री ८ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडून मेट्रो स्थानकांची पाहणी

पुणे : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी पुणे मेट्रोच्या फुगेवाडी ते सिव्हील कोर्ट आणि गरवारे कॉलेज ते रुबी हॉल मार्गिकेचे लोकार्पण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी रुबी हॉल, सिव्हिल कोर्ट आणि शिवाजी नगर मेट्रो स्थानकांची पाहणी केली आणि रुबी हॉल स्थानक ते शिवाजी नगर मेट्रो स्थानकादरम्यान प्रवासदेखील केला.यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त सौरभ राव, मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, मेट्रोचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत सोनवणे यांच्यासह मुरलीधर मोहोळ, राजेश पांडे आदी उपस्थित होते.

**मेट्रोने प्रवास करण्याचे आवाहन**

यावेळी पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, या दोन मार्गांमुळे पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर जोडले जाणार असून पुणे शहरातील महत्वाच्या ठिकाणी प्रवासदेखील सुलभ होणार आहे. नवीन मार्ग शिवाजी नगर, सिव्हिल कोर्ट, आरटीओ, पुणे रेल्वेस्टेशन, पीएमसी, संभाजी उद्यान, डेक्कन इत्यादी महत्वाच्या भागांना जोडत असल्याने पुणेकर नागरिकांना याचा फायदा होणार आहे.

मेट्रो मार्गामुळे पुणेकरांना प्रवासाचा चांगला पर्याय उपलब्ध होणार असून शहरातील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत होईल. नागरिकांना मेट्रो स्थानकापर्यंत प्रवास करण्यासाठी इलेक्ट्रिक बस आणि पार्किंगची सुविधादेखील असणार आहे. त्यामुळे नागरिकांनी मेट्रोद्वारे प्रवास करावा, असे आवाहन त्यांनी केले. पाटील यांनी मेट्रो चालविणाऱ्या महिला चालकाशी संवाद साधून त्यांचे अभिनंदन केले.

**असा आहे मेट्रो मार्ग**

पुणे मेट्रोच्या फुगेवाडी ते सिव्हील कोर्ट या ६.९ किलोमीटरच्या मार्गिकेवर ४ स्थानके आहेत, तर गरवारे कॉलेज ते रुबी हॉल या ४.७ किलोमीटरच्या मार्गिकेवर ७ स्थानके आहेत. अशाप्रकारे आतापर्यंत एकूण २१ स्थानकांसह २३.६६ किमी लांबीचा मेट्रो मार्ग पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात कार्यान्वित करण्यात आला आहे. यामुळे प्रवासाचा वेळ ५० टक्क्यांनी कमी होणार आहे. डेक्कन, शिवाजीनगर आणि पुणे महानगरपालिका येथे पीएमपीएमएल सेवेबरोबर समन्वय साधण्यात येणार आहे.

### न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय..

राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी न्या. उपाध्याय यांच्या नियुक्तीबाबत राष्ट्रपतींची अधिसूचना वाचून दाखवली. राष्ट्रगीत व राज्यगीताने शपथविधी सोहळ्याची सुरुवात झाली व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय यांचा जन्म दिनांक १६ जून १९६५ रोजी झाला. न्या. उपाध्याय यांनी १९९१ मध्ये लखनौ विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली आणि ११ मे १९९१ रोजी वकील म्हणून नोंदणी केली. त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठात नागरी आणि घटनात्मक बाजूने कामकाज पाहिले. दिनांक २१ नोव्हेंबर २०११ रोजी त्यांना अतिरिक्त न्यायाधीश पदावर बढती मिळाली आणि ६ ऑगस्ट २०१३ रोजी त्यांची न्यायाधीश पदावर नियुक्ती करण्यात आली.

### बुलढाण्यात दोन बसेसची

या घटनेमुळे महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. हिंगोली येथील ट्रॅव्हल्स कंपनीची लक्सरी बस क्र. एम.एच.०८/९४५८ ही अंबरनाथवरुन ४० प्रवाशांना घेऊन परतीच्या वाटेवर होती. दरम्यान, नागपूरवरुन नाशिककडे जात असलेल्या क्र.एम.एच. २७ बी.एक्स. ४४६६ या बसने समोरच्या बसला चालकाच्या बाजूने चिरत पुढे गेली. त्यामुळे समोरासमोर आलेल्या दोन्ही लक्झरी बसेसमध्ये भीषण अपघात झाला. त्यात हिंगोलीला परतीच्या वाटेवर असलेले ५ प्रवासी जागीच ठार झाले. तर २५ जण गंभीर जखमी झाले. त्यांना मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. अन्य एका जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्गावर चक्का जाम झाला त्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, याआधी बुलढाण्यात १ जुलै रोजी नागपूरहून पुणे येथे जात असलेली विदर्भ ट्रॅव्हल्सची बस दुभाजकावर धडकून उलटल्यानंतर बसने पेट घेतला होता. या अपघातात बसचा चालक, वाहक बचावले होते, पण २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता.

### मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्रातील

उभारणीसाठी ६कोटी ३७ लाख रुपये इतका निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर पंढरपूर येथील सार्वजनिक बांधकाम विश्रामगृह याठिकाणी नवीन विश्रामगृह उभारणीसाठी आवश्यक निधी मिळण्यासाठीही आमदार आवताडे यांनी पाठपुरावा केला होता. देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी पंढरपूर हे एक अध्यात्मिक केंद्रस्थान आहे. त्यामुळे पंढरपूर येथे अनेक अतिमहत्त्वाच्या व महत्त्वाच्या व्यक्ती दर्शनासाठी येत असतात. या शासकीय विश्रामगृहामध्ये सध्या दहा कक्ष आहेत परंतु येथे येणाऱ्या व्यक्तींची संख्या पाहता सदर ठिकाणी सुसज्ज शासकीय विश्रामगृह बांधण्यासाठी २१कोटी १४लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.त्याचबरोबर मतदारसंघातील विविध गावांना व निरनिराळ्या ठिकाणी जोडणारे अनेक रस्ते काळ्या मातीतून जात असल्याने या ठिकाणी वाहतुकीला व दैनंदिन रहदारीला अडथळा निर्माण होऊन अनेक अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर रस्ते सुधारित व पक्के करण्यासाठी आ आवताडे यांनी काही रस्त्यांसाठी निधीची मागणी केली होती. या रस्त्यांच्या सुधारणा विकास कामांसाठी २६ कोटी ८४लाख इतका निधी मंजूर झाला आहे.

या निधी अंतर्गत मंजूर झालेले रस्ते - मंगळवेढा तालुक्यातील गुंजेगाव आंधळगाव पाटखळ नंदेश्वर भोसे हुन्नूर रेवेवाडी (खडकी ते नंदेश्वर) व (भोसे ते हुन्नूर) मध्ये सुधारणा करणे ५ कोटी, घेरडी हुन्नूर मारोळी सलगर ते प्रजिमा-८ मिळणारा रस्ता( लवंगी ते आसबेवाडी) रस्ता सुधारणा करणे १०कोटी , पंढरपूर तालुक्यातील तावशी ते चिचुंबे रस्ता सुधारणा करणे तसेच तावशी ते चिचुंबे मार्गावर व्ही आर-८६ येथे लहान पुलाचे बांधकाम करणेसाठी २ कोटी ८४ लाख, एमएसएच-८ भालेवाडी डोणज नंदुर रस्ता सुधारणा करणे ९कोटी.

## महेश इंगळे मंदिर समितीस लाभलेले बहुगुणी नेतृत्व : चंद्रकांत दादा मोरे

अक्कलकोट/प्रतिनिधीः स्वामी भक्तीची व सेवा कार्याची परंपरा इंगळे कुटुंबीयांना लाभली असून त्या प्रेरणेतूनच महेश इंगळे हे वटवृक्ष मंदिर समितीच्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून स्वामी सेवेतच आपले दैनंदिन जीवन व्यतीत करणारे व्यक्तीमत्व असून यापेक्षा मोठे भाग्य ते काय ? यामुळे महेश इंगळे म्हणजे वटवृक्ष मंदिर समितीस लाभलेले बहुगुणी नेतृत्व होय. त्यांच्या या उमद्या व प्रभावी व्यक्तीमत्वामुळे त्यांना वटवृक्ष मंदिर समितीच्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून स्वामी सेवेची संधी लाभली असल्याचे मनोगत त्र्यंबकेश्वर गुरुपीठकृत अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे प्रमुख चंद्रकांत



दादा मोरे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास सपत्निक भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी सौ.व श्री. चंद्रकांत दादा मोरे यांचा स्वामीचे कृपावस्त्र, प्रसाद, देवून यथोचित सन्मान केला. यावेळी चंद्रकांत दादा बोलत होते. या प्रसंगी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, विपूल जाधव, गिरीश पवार, नितीन कोळी इत्यादी उपस्थित होते.

## नागपूर देशातील सर्वोत्कृष्ट शहर म्हणून विकसित करणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : नागपूर शहरातील सर्व रस्ते येत्या दोन वर्षात सिमेंट काँक्रीटचे करण्यात येऊन हे शहर खड्डेमुक्त व देशातील सर्वोत्कृष्ट शहर म्हणून विकसीत करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.जयताळा येथे नागपूर महानगरपालिका, नासुप्र आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या विविध विकासकामांचे डिजिटल लोकार्पण व भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले, त्याप्रसंगी श्री.फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला आमदार सर्वश्री प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, मोहन मते, महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती मनोज सुर्यवंशी, विश्वस्त संदीप इटकेलवार, बंटी कुकडे नाना श्यामकुळे, किशोर वानखेडे आदी उपस्थित होते.

शहरातील विविध विकास कामांसाठी अर्थसंकल्पात ८ हजार कोटी निधीची तरतूद करण्यात आली. क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा तयार करण्यासाठी १०० कोटी मंजूर केले आहेत, यासोबत नागपूरच्या विविध भागात खेळासाठी ५० ते ६० स्टेडीअम उभारण्याकरिता १०० कोटी निधी मंजूर करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महराष्ट्र समृद्धी महामार्ग आणि नागपूरात एक हजार एकरावर होत असलेल्या पुरवठा साखळी हब मुळे नागपूर हे लवकरच देशाचे लॉजिस्टीक कॅपीटल म्हणून उदयास येईल असे ते म्हणाले.

नागपूर शहरातील पट्टे वाटपाचे धोरण राबवितांना एकात्मता नगर व रमाबाई आंबेडकर नगर या दोन वस्तींमध्ये जागा झुडपी जंगल श्रेणीत येत असल्याने मालकी हक्क नाकारण्यात आले होते. याबाबत सुप्रीम कोर्टात बाजू मांडण्यात आली असून झुडपी जंगलाची जागा महसूली जागा म्हणून गणल्या जावून नागरिकांना लवकरच मालकी हक्काचे पट्टे मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 'शहरात मेट्रो, मिहान, एम्स, सिम्बॉयसिस, मेयो-मेडिकलचा विकास यासारखी विविध विकासकामे जनतेच्या सहकार्याने करण्यात आली असल्याचे सांगितले. लवकरच संपूर्ण नागपूरात चोवीस तास पाण्याची सुविधा मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे, असेही ते म्हणाले. गरिबांना कायदेशीर मार्गाने स्वस्तात घरे दिल्यास अनधिकृत वस्त्या निर्माण होणार नाहीत, यासाठी राज्य शासनाने योजना आखण्याची मागणीही त्यांनी केली. विकास कामामुळे नागपूरची आंतरराष्ट्रीय शहर म्हणून ओळख निर्माण होईल असे त्यांनी सांगितले. मंत्रीद्वयांच्या हस्ते महानगरपालिकेच्या जयताळा येथील नवीन जल कुंभाचे तसेच वर्धा रोड ते जयताळा बाजार पर्यंतच्या सिमेंट रोड




चे लोकार्पण आणि पर्यावरण पूरक दफनभूमी विकास कामाचे भूमिपूजनाचे डिजिटल लोकार्पण करण्यात आले. तसेच नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारितील दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातील सिमेंट रस्ते, पर्जन्य वाहिनी, मलवाहिका, इंटलॉकिंग ब्लॉक, जयताळा येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण या कामांचे भूमीपूजन आणि ऑनलाईन गुंठेवारी, ऑनलाईन भाग नकाशा, सात दिवसांत लिज पट्टा संगणकीय प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले.

आमदार प्रविण दटके यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. महानगरपालिका आायुक्त सुभाष चौधरी यांनी प्रास्ताविकेतून कार्यक्रमाची माहिती दिली तर मनिष सोनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यासचे पदाधिकारी, अधिकारी, लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

